
श्री साईबाबा संस्थान ट्रस्ट, शिर्डीचे
अधिकृत नियतकालिक

जानेवारी–फेब्रुवारी २०१९
रुपये ८/-

# साईलीला

स्थापना १९२३

## नववर्ष विशेष



मकर संक्रमणाच्या शुभेच्छा!

तीळगूळ घ्या । गोड बोला !!
तीळगूळ घ्या । साईनाम घ्या !!

# श्री दत्तजयंती निमित्त श्री साईबाबा समाधी मंदिरात श्री दत्त जन्मोत्सव साजरा





श्री दत्तजयंती निमित्त श्री साईबाबा समाधी मंदिरात श्री दत्त जन्मोत्सव साजरा झाला. यावेळी सौ.सरस्वती वाकचौरे, प्र.मंदिर विभाग प्रमुख रमेश चौधरी, कर्मचारी, शिर्डी ग्रामस्थ व साईभक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.



श्री दत्तजयंती निमित्त श्री साईबाबा समाधी मंदिर, लेडीबागेतील श्री दत्त मंदिर व मंदिर परिसरात करण्यात आलेली आकर्षक फुलांची सजावट.




✻ स्थापित वर्ष १९२३ ✻ नूतन नोंदणी वर्ष १९, अंक १ ✻


# साईलीला

जानेवारी-फेब्रुवारी २०१९ • नववर्ष विशेष

✻ संपादक : मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिर्डी

✻ कार्यकारी संपादक :
विद्याधर ताठे (एम.ए.(मराठी), बी. जर्नालिझम)







## अंतरंग...


- **संपादकीय** : विद्याधर ताठे ५
- **हेमाडपंतांची साईगणेश वंदना** : ७
- **साईकाव्य** ९
- **बाबांच्या अखंड धूनीतील उदीचा महिमा** : भालचंद्र गन्द्रे १०
- **बाबांचा नानांना गीतोपदेश** : सौ. नयना मेंगळे १२
- **नवीन वर्षाचा साईसंकल्प** : सौ. मयुरी कदम १५
- **कशेळीचे कनकादित्य सूर्यमंदिर** १९
- **श्री सूर्यस्तुती** २१
- **साई अनुभव** : १) माझ्यासाठी उदी व प्रसाद पाठवतील २२
- २) मी तर मस कामास येईन २३
- **शिर्डी वृत्त** : जनसंपर्क विभाग २४
- **मान्यवर भेटी** ३५




# श्री. साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

## व्यवस्थापन समिती

**डॉ. सुरेश काशिनाथ हावरे** (अध्यक्ष)
**श्री. चंद्रशेखर लक्ष्मणराव कदम** (उपाध्यक्ष)
**श्रीमती रुबल अग्रवाल, भा.प्र.से.** (सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी)
**श्री. प्रताप सखाहरी भोसले** (सदस्य)
**डॉ. मनिषा शामसुंदर कायंदे** (सदस्य)
**ॲड. मोहन मोतीराम जयकर** (सदस्य)
**श्री. भाऊसाहेब राजाराम वाक्चौरे** (सदस्य)
**डॉ. राजेंद्र राजाबली सिंग** (सदस्य)
**श्री. रविंद्र गजानन मिर्लेकर** (सदस्य)
**श्री. बिपीनदादा शंकरराव कोल्हे** (सदस्य)
**श्री. अमोल गजानन कीर्तिकर** (सदस्य)
**सौ. योगिताताई शेळके** (पदसिद्ध सदस्य)
**श्री. धनंजय निकम** (उपजिल्हाधिकारी)
**श्री. मनोज घोडे पाटील** (उपजिल्हाधिकारी)
**श्री. बाबासाहेब घोरपडे** (प्रभारी उपकार्यकारी अधिकारी)



इंटरनेट आवृत्ती : URL : http://www.shrisaibabasansthan.org

● टपालखर्चासहित वार्षिक वर्गणी : रू. ५०/- ● आजीव सभासद वर्गणी : रू. १०००/- ● परदेशाकरिता वार्षिक वर्गणी : रू. १०००/-



**● कार्यालय ●**

'साईनिकतन, ८०४ बी, डॉ. आंबेडकर मार्ग, दादर, मुंबई-४०० ०१४. दूरध्वनी : २४१६६५५६ फॅक्स (०२२) २४१५०७९८
ई-मेल : saidadar@sai.org.in ✻ शिर्डी कार्यालय : मु. पो. : शिर्डी - ४२३ १०९,
ता. राहाता, जि. अहमदनगर, दूरध्वनी : (०२४२३) २५८५००
फॅक्स : (०२४२३) २५८७७० ई-मेल : 1. saibaba@shrisaibabasansthan.org 2. saibaba@sai.org.in



- आवरण व अन्य पृष्ठे सजावट : समीर गोरे, पुणे सिध्दीविनायक ग्राफीक्स, पुणे. फोन. : ९३७०१४२६७६
- संगणकीय अक्षर जुळणी : ओके क्रिएशन, पुणे ● मुद्रित शोधन : सौ. अपर्णा जोशी
- मुद्रन स्थळ : टॅको व्हिजन प्रा. लि. १०५, अे.बी.सी. गर्व्हमेंट इं. इस्टेट, चारकोप, कांदीवली (प.) मुंबई- ४०० ०६७
- सर्वसाधारण अंकाचे मूल्य : रू. ८/- ● श्री साईपुण्यतिथी विशेषांकाचे मूल्य : रू. १५/-
- प्रकाशक व मुद्रक कार्यकारी अधिकारी यांनी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी करिता हे द्वैमासिक टॅको व्हिजन प्रा. लि. १०५, अे.बी.सी. गर्व्हमेंट इं. इस्टेट, चारकोप, कांदीवली (प.) मुंबई- ४०० ०६७ येथे छापून 'साईनिकेतन', ८०४-बी, डॉ. आंबेडकर मार्ग, दादर, मुंबई-४०० ०१४ येथे प्रकाशित केले.
- नियतकालिकातील लेखांत प्रसिद्ध झालेली मते त्या लेखकाची लेखकांची स्वतंत्र मते असून, त्या मतांशी संपादक, प्रकाशक सहकमत असतीलच असे नाही.
- सर्वप्रकारच्या हरकती, वादविवाद, मतभेद, हक्क, कायदेशीर कार्यवाही आदी बाबी मुंबई परिक्षेत्रातच उपस्थित करता येतील.



# संपादकीय

विद्याधर ताठे - कार्यकारी संपादक

नववर्षाच्या व मकर संक्रांत पर्वाच्या समस्त साईभक्तांना सानंद सहर्ष शुभेच्छा !

तीळगूळ घ्या । गोड बोला !! तीळगूळ घ्या । साईनाम घ्या !!

श्री साईबाबांच्या महाशताब्दीचे वर्ष म्हणून २०१८ आपण धुमधडाक्यात साजरे केले, साईनाम घोषाने सारे विश्व दुमदुमून गेले. एका अमृत योगाचे आपण सर्वजण साक्षी होतो हे आपले भाग्य, हीच श्री साईंची कृपा ! सरत्या वर्षाला (२०१८) साईसाक्षीने निरोप देण्यासाठी आणि साई सान्निध्यात नववर्षाचा (२०१९) श्रीगणेशा करण्यासाठी लाखो साईभक्तांनी प्रतिवर्षाप्रमाणे शिर्डीला प्रचंड गर्दी केली. हा साईभक्तांचा अफाट जनसागर एका सामाजिक परिवर्तनाचे दर्शन आहे.

श्री साईभक्तीच्या प्रभावाने, लाखो लोक आपला 'इअरएन्ड' कोण्या बेधुंद क्लबमध्ये न घालवता शिर्डीच्या पावन क्षेत्राची निवड करतात व साईभक़्तीत रंगून जातात. हे परिवर्तन लक्षात घेण्याजोगे आहे. या दृष्टीने साईभक्ती ही केवळ पूजा-उपासना राहिली नसून एक सामाजिक - मानसिक परिवर्तनाचे पावन साधन झालेली आहे. आधुनिक समाजातील पालकांना आपल्या तरुण पिढीला जे काम वारंवार उपदेश करून करता येणे अशक्य वाटते असे सात्त्विक विधायक परिवर्तन साईभक्ती योगे घडले आहे, घडते आहे हे एक मिरॅकल आहे.



**दि. २२ डिसेंबर २०१८ ते दि. १ जानेवारी २०१९ या कालावधीत नऊ लाख, पन्नास हजार (९लाख ५० हजार) साईभक्तांनी शिर्डीमध्ये साईसमाधीचे दर्शन घेतले, हा एक विक्रम आहे.** या संदर्भात संस्थानचे उपाध्यक्ष श्री चंद्रशेखरभाऊ कदम यांचे सविस्तर निवेदन आम्ही या अंकात दिलेले आहे ते वाचकांनी जरुर वाचावे आणि साईभक्तीच्या वाढत्या प्रभावाची शब्दप्रचिती घ्यावी.

भारतीयांच्या दृष्टीने सूर्याचे मकरसंक्रमण हिच नववर्षाची खरी सुरुवात. मकर संक्रमणाचा काळ अवघ्या भारतवर्षामध्ये सर्व प्रांतात, सर्व लोकात-समाजात मोठ्या पावन मनाने पर्वकाळ म्हणून साजरा केला जातो. हे सूर्यसंक्रमण साऱ्या मानवजातीच्या जीवनातच एक नवे परिवर्तन घेऊन येते. भारतीय अध्यात्म व सणवार

हे निसर्गचक्रानुकूल विज्ञानाधिष्ठीत आहेत. फक्त आपण त्या त्या धार्मिक विधिविधाना मागचे सूक्ष्म विज्ञान नव्याने समजून घेण्याची गरज आहे. आपले हवामान, पीकपाणी आणि ग्रामीण अर्थव्यवस्था ही या मकर संक्रमणाशी जोडलेली आहे. म्हणून संक्रांतीचा काळ उत्साहाने, चैतन्याने नव्या स्वप्नाकडे, नव्या संकल्पाकडे नव्या दृढविश्वासाने वाटचाल आरंभ करण्याचा शुभंकर काळ मानला जातो. चला आपणही काही शुभ संकल्प करूयात व साईभक्तीपासून प्रेरणा घेऊन नव्या कार्याचा आरंभ करूया. जय साई राम ।



''आपले उत्सव आणि हवामान यांचा पूर्वापार अतूट संबंध आहे. त्या मागची सामाजिक भावना व वैज्ञानिक दृष्टी आपण लोकांना समजून सांगितली तर नव्या पिढीला उत्सव साजरा करण्याची जाणीव होईल'' असे विज्ञान संशोधक डॉ. माधवराव चितळे म्हणतात. आपण अशी जागृती केली तर मग 'उत्सव' हे केवळ प्रदर्शनीय 'इव्हेंट' न होता अधिक सार्थ व समर्पक पद्धतीने जाणीवेच्या पातळीवर सामाजिक बांधिलकीचे भान ठेवून साजरे होतील, असे आम्हास वाटते.


साईलीला द्वैमासिकाचा २०१९ मधील हा पहिला अंक आहे. पुढील मार्च–एप्रिल चा अंक हा 'श्रीरामनवमी विशेषांक' असेल. एप्रिल महिन्यात दि. १३, शनिवार रोजी 'श्रीरामनवमी' आहे. या शुभदिनी आपले साईलीला द्वैमासिक ९५ वर्षाची वाटचाल पूर्ण करून ९६व्या वर्षात पदार्पण करणार आहे. १९२३ साली रामनवमी उत्सवात साईलीलाचा पहिला अंक साईसमाधीवर अर्पण करण्यात आला होता व साईबोधाची दीपकलिका प्रज्वलित करण्यात आली होती. आज ९५ वर्षे हे मासिक – द्वैमासिक अखंडपणे, अविरतपणे साईभक्तीच्या प्रचारार्थ प्रकाशित होत आहे. ही साईबाबांच्या कृपेचीच प्रचिती आहे. जय साईराम !!

**श्रद्धा सबुरी मंत्र दो, सबक मालिक एक ।**
**पंथ महंत अनेक है, संत साई सा एक ।।**

– विद्याधर ताठे
**कार्यकारी संपादक 'साईलीला'**
मोबा. 9881909775
E-mail : vidyadhartathe@gmail.com

**वाचकांना आवाहन :**
आपण सर्वांनी यापुढे 'साईलीला'चे वर्गणीदार वाढवून साईभक्तीप्रचारात भाग घ्यावा, हीच खरी साईपूजा–साईसेवा आहे. शताब्दी वर्षापर्यंत आपण आपले वर्गणीदार दुप्पट करूयात. प्रत्येकाने नातेवाईक –मित्रपरिवाराची वर्गणी भरून त्यांचे पत्ते पाठवून साईभक्तीगंगा त्यांच्या घरी–दारी न्यावी.

● टपालखर्चासहित वार्षिक वर्गणी : रू. ५०/– ● आजीव सभासद वर्गणी : रू. १०००/–



शिर्डी साईसमाधी परिसरातील गणेश मंदिर

### माघ गणेश जयंती निमित्त

# हेमाडपंतांची साईगणेश वंदना

**माघ महिन्यातील शुध्द पक्षात गणेश जयंती उत्सव सर्वत्र धार्मिक विधींनी साजरा केला जातो. साईभक्त हेमाडपंत यांनी साईबाबांची गणेशरुपात वंदना केलेली आहे.**

हेमाडपंतकृत 'श्री साईसच्चरित' पोथी साईभक्तांचे गीता-भागवत आहे. हा ग्रंथ साईबाबांच्या अनुमतीने साईबाबा असतानाच हेमाडपंत यांनी लिहिला व बाबांना लिहिला तसा तसा वेळोवेळी वाचूनही दाखविलेला आहे. इ.स. १९२३ साली, म्हणजे बाबांच्या महासमाधीनंतर ५ वर्षांनी मुंबईतून संस्थानच्या 'साईलीला' मासिकाचे प्रकाशन सुरू झाले आणि हेमाडपंतांचा 'श्री साईसच्चरित' ग्रंथ अध्यायवार 'साईलीला' मधून क्रमशः प्रकाशित झाला. १९२३ च्या चैत्र महिन्याच्या पहिल्या अंकात हेमाडपंत विरचित श्री साईसच्चरित ग्रंथातील 'गणेशवंदना' प्रसिद्ध झालेली आहे.

**प्रथम वंदू गणपती ।**
**वक्रतुंड हेरंब मूर्ती ।**
**चतुर्दश विद्यांचा अधिपती ।**
**मंगलाकृति गजमुख ।।३।।**
**पोटीं चतुर्दश भुवनें मावतीं ।**
**म्हणोनि गा तुज लंबोदर म्हणती ।**
**परशु सतेज धरिसी हस्तीं ।**
**विघ्नोच्छित्त्यर्थ भक्तांच्या ।।४।।**
**हे विघ्नविघातोपशमना ।**
**गणनाथा गजानना ।**
**प्रसाद पूर्ण करीं मद्वचना ।**
**साष्टांग वंदना करितों मी ।।५।।**

हेमाडपंतांच्या या श्री साईसच्चरिताच्या आरंभीच्या ओव्या आणि संत ज्ञानेश्वर – एकनाथांच्या गणेशवंदना यांमध्ये एकप्रकारे विलक्षण साम्य आहे.

भक्तांचा साह्यकारी, भवार्णवाची पोत, ज्ञानज्योत, मूषकवहना, गिरिजानंदना, मंगलवदना अशा अनेक विशेषणांनी हेमाडपंतांनी आपल्या गणेशवंदनेच्या ओव्यांमध्ये श्री गणेशाची स्तुती केलेली आहे आणि ग्रंथलेखनाची निर्विघ्न समाप्ती व्हावी, अशी प्रार्थना केलेली आहे.

पुढे हेमाडपंत श्री साईबाबांचीच गणेशरूपात वंदना करतात, ती अशी –

**हा साईच गजानन गणपती ।**
**हा साईच घेऊनि परशु हातीं ।**
**करोनि विघ्नविच्छित्ती ।**
**निज व्युत्पत्ति करू कां ।।१०।।**

**हाचि भालचंद्र गजानन ।**
**हाचि एकदंत गजकर्ण ।**
**हाचि विकट भग्नरदन ।**
**हा विघ्नकानन – विच्छेदक ।।११।।**
**हे सर्वमंगलमांगल्या ।**
**लंबोदरा गणराया ।**
**अभेदरूपा साई सदया ।**
**निजसुखनिलया नेईं गा ।।१२।।**

हेमाडपंतांप्रमाणेच सर्व साईभक्तांनाही साईबाबा हेच श्री गजानन वाटतात. श्री साईंच्या, म्हणजेच साईगणेशाचया वंदनेने – स्तुतीने आपल्या नव्या वर्षाचा 'श्रीगणेशा' होवो, आपणास हे नववर्ष सुखसमृद्धीने भरभराटी जाण्यात घडो, हीच मंगलकामना !

## महाराष्ट्रातील अष्टविनायक




# श्री स्वामी समर्थ

डॉ. श्रीकांत नरुले

भक्तांचा हा भक्त जाहला,
विसरला मीपण
स्वामींना भक्तिचे बंधन ।
जय जय स्वामी समर्थ,
जय जय स्वामी समर्थ ।।

भक्तांना पावतो
हा स्वामी सेवेला धावतो
देव ह्या करताती वंदन ।
फुलांतूनी हासतो
प्रभू हा पिकातूनी डोलतो
पिकवितो मळाच हा राबून ।
योग्याना ना मिळे
सौख्य हे भक्तासाठी खुले
गुरु हा झिजे जसा चंदन ।





# साई म्हणे

मजवरी कुणाचे प्रेम खरे ?
जे बहिरे मूक तरी गहिरे
जे मुक्त बंधनातूनि सारे
जे न दिखाऊ करी नखरे
जे जाणून घेऊ मज नजरे
जे देण्या-घेण्या कधी न करे
जे पायरी कधी नच उतरे
जे स्फूर्ति विलासातून बहरे
जे करी न चौकशी परभारे
जे व्यक्त होत नच उपचारे
मज देई कुणी का असे बरे
मजवरी कुणाचे प्रेम खरे ?

– प्रा.डॉ. माधवराव दीक्षित



# बाबांच्या अखंड धूनीतील उदीचा महिमा

भालचंद्र केशव गन्द्रे, ठाणे

बाबा द्वारकामाईत बसून अनेक दुःखी-कष्टी जीवांची सेवा करीत असत. प्रथम-प्रथम ते लोकांना औषधे देत असत. पण जस-जशी गर्दी वाढली तस-तशी समोरच पेटवलेल्या अखंड धूनीतील चिमूटभर राख उचलावी नि भक्तांना द्यावी असा सपाटाच बाबांनी सुरू केला. ही राख (उदी) भक्ताला 'कामधेनू' ठरु लागली. कुठलाही रोग असो, इडा-पिडा, दुःख असो, बाबांच्या हातून मिळालेल्या ह्या राखेमुळे प्रत्येक प्रश्न भराभर सुटून, दुःखी जीव भयमुक्त, संकटमुक्त होऊ लागला.ह्या उदीचा महिमा बाबांच्या 'श्रीसाईसच्चरितात' जागोजागी प्रकर्षाने दिसून येतो.

बाबांनी स्वहस्ते चालू केलेली ही अखंड धूनी आजही शिर्डीत अखंड-अव्याहत पेटते आहे. ह्या अखंड अग्नीत, माझ्या भक्ताचा अहंकार, मी पणा, संकट भस्म होवो व ज्या देहाचे चोचले आपण जीवंतपणी सातत्याने पुरवतो, तो देहही शेवटी अग्नीत भस्म होऊन त्याची चिमूटभर राखच होणार आहे याची यादच जणू ह्या धूनी रुपाने बाबा साऱ्या भक्तांना देत आहेत. जगतांना आपल्या भोवतालच्या जीवांना आनंद, प्रेम, विश्वास द्या. आपल्या सत्कर्माच्या समिधा जीवनाच्या अग्नीत फेका, त्याग शिका नि ह्या यज्ञ कुडा भोवतालच्या जीवांना यज्ञाचा आनंद द्या, असे तर बाबांना सुचवायचे असेल कां? यासाठी प्रत्येक माणसांनी इतरांकडे



अंगुली-निर्देश न करता, मी काय करतोय? नि मला त्यागमय-सेवामय कसे जगात येईल याचा आदर्श बाबांच्या द्वारकामाईतून (मशिदीतून) घ्यावयास हवा. जो-तो स्वार्थी झालाय, स्वतःच्या सुखापलिकडे, दुसऱ्याचे दुःख पहायला, त्यावर फुंकर घालायला कुणालाच आज वेळ नाही. प्रत्येक जीव जर हेच करीत असेल तर बाबांच्या द्वारकामाईत येऊन त्याला सत्याचा नेमका बोध काय झाला? नि बाबांकडून त्याने कोणती दीक्षा घेतली? कोणता आदर्श घेतला, असे म्हणावे? यासाठी द्वारकामाईत पाय ठेवणाऱ्या बाबांच्या भक्तांनी आत्मपरिक्षण करण्याची वेळ खरोखरच आज आली आहे. प्रत्येकाने फक्त स्वतःभोवती न फिरता, दुःखी-कष्टी जीवांची याद ठेवावयास हवी नि बाबांचा सेवाभाव ध्यानी ठेवून, जमेल तेवढी सेवा, आपल्या अवती-भोवतीच्या जीवांची करायला मनापासून शिकायला हवे. जस-जशी ही सेवा, त्यागी जीवन वाढेल तेव्हा आपल्या हातून अनाहूतपणे घडलेल्या ह्या सत्कृत्यामुळे समोरचा जीव सुखी होताना, जसं जसे आपण पाहू लागू, तस-तसा जीवनाचा खरा आनंद नि सत्याची खरी जाणीव प्रत्येकाला होऊ लागेल व खऱ्या अर्थाने आम्ही ''साईमय'' झालो असे म्हणता येईल.

**''उदी'' म्हणजे बाबांचे जणू आत्मतत्त्वच आहे. उदीच्या रुपाने बाबा भक्तांची आधिदैविक, आधिभौतिक व आध्यात्मिक संकटे नष्ट करतात. ही उदी म्हणजे जणू संजीवनीच आहे. बाबांचे अलौकीक दिव्य योगसामर्थ्य व परब्रह्मतत्त्वच या उदीमध्ये प्रगटले आहे.** या उदीला जाती-धर्म, वंश, लिंग, उच्च-नीच, गरीब-श्रीमंत असा भेदाभेद नाही. तसेच स्थळ, काळ, वेळ, पवित्रता, सुचिर्भूतता, मुहूर्त इत्यादिंचे बंधन नाही, फक्त भाव-भक्ति श्रद्धाच हवी. भगवान शंकरही अंगाला भस्म लावतात. तसेच भगवान दत्तात्रेयही सर्वांगास भस्मच लावतात. आपणही घरांत धूप, उदबत्ती देवापुढे लावून त्याची राख विश्वासाने कपाळी लावतो. ही राख, विभूती, अंगारा, भस्म सायंकाळी घरांत फुंकून, तसेच दरवाज्याबाहेर फुंकूनही दुष्ट, अघोरी शक्तिचा बिमोड होतो या श्रद्धेने अनेक घरांत नियमाने फुंकली जाते.

उदी रूपाने बाबाच, **''नित्य मी जीवंत, जाण हेचि सत्य । नित्य घ्या प्रचित अनुभवे ।''** या वचनाप्रमाणे आपल्या साऱ्या भक्तांना विश्वास देत आहेत. बाबा ही **''उदी''** प्रसाद म्हणून देतांना ती अंगठ्याने भक्ताच्या कपाळावर लावीत व तोच हात त्याच्या शिरावर ठेवून आशीर्वाद देत असत. बाबा खूषीत असले की, **''रमते राय आयोजी । उदीको गोनिया लायोजी''** हे ध्रुवपद सतत कां म्हणत असत, ह्याचा अर्थ भक्तांनी जरुर ध्यानी घ्यावा.

आजही शिर्डी संस्थांमार्फत बाबांची ही संजीवनी-उदी प्रत्येक भक्तास देण्यात येते. (त्यासाठी खास सोय केलेली आहे) ही चमचाभर उदी कशी पुरणार? म्हणून आम्हाला आणखी उदी हवी आहे. परंतु लाखो साईभक्तांची शिर्डीतील उपस्थिती पाहिली की, प्रत्येक जीवाला हे ''अमृत'' मिळायला हवे हे जसं आम्हाला पटेल, तस-तसा आमचा आणखी जास्त उदी मिळवण्याचा हव्यास आपोआपच थांबेल. शिर्डीत मिळणारी ही बाबांची उदी प्रत्येकाने आपल्या घरच्या डबीत जपून ठेवावी. देवापुढे ध्यानाला बसताना, पोथी वाचतांना नेहमी उदबत्ती लावाली व ही उदबत्तीची राख मूळ उदीत टाकून संग्रह करावा. घरांतून बाहेर जाताना प्रत्येकवेळी ही उदी श्रद्धेने कपाळी लावावी. तसेच कुठल्याही शारीरिक व्याधीसाठी, संकटकाळी ही चिमूटभर उदी श्रद्धेने पाण्यांत टाकून, ''नामस्मरण'' करूनच ते पाणी अवश्य घेण्याची प्रथा आहे. सर्वव्यापी बाबा आपल्या भक्ताची आर्त हाक क्षणांत ऐकून, त्याचे संकट हमखास दूर करतात हे निश्चित . मात्र, त्यासाठी सर्वांनी त्यागी, सेवामय जीवनाचा संकल्प करून, बाबांना श्रद्धेने शरण जावयास हवे हेच खरे !!



# बाबांचा नानांना गीतोपदेश

सौ.नयना अशोक मेंगळे

श्रीसाईबाबांचे कुठल्या शाळेत किंवा कुण्या गुरुकडे शिक्षण झालेले नव्हते. त्यांची बोलण्याची भाषा अगदी साधी सोपी खेडवळ मराठी किंवा उर्दू असावयाची. त्यांनी कुठलेही ग्रंथ वाचले नव्हते मग संस्कृत तर दूरच ! बाबांनी उपदेश करण्यासाठी इतर संतांप्रमाणे ग्रंथ लिहिले नाहीत किंवा प्रवचनेही केली नाहीत. द्वारकामाईत त्यांच्या सभोवताली भक्त एकत्र होत त्यावेळी गप्पागोष्टीत बाबा जे काही बोलत किंवा सांगत हाच त्यांचा उपदेश ! यातही त्यांचे वैशिष्ट्य होते. पहिले म्हणजे उपदेश करतांना बाबा अगदी गहन विषय सुद्धा हसतखेळत थट्टामस्करी करून सांगत असत. त्यामुळे तो साध्याभोळ्या गावकऱ्यांनाही आवडत असे व समजत असे. उदा. ब्रह्मज्ञानासारखा गहनांत गहन विषय, पण तो समजावून सांगताना ब्रह्मज्ञान जिज्ञासूंच्या खिशातून २५० रुपयांच्या नोटांचे बंडल काढवून त्याच्या लोभीपणाची थट्टा करून सांगितला. श्रीसाईसच्चरित्रकार दाभोळकरांची फुटाण्यांवरून थट्टा करून बाबांनी एकेकटे कधी खाऊ नये, कोणी जवळ नसल्यास बाबांचे स्मरण तरी करून खावे ही शिकवण सर्वांना कशी दिली हे सर्वश्रुत आहेच.

त्यांना सर्व ग्रंथांतील विषयांचीच काय पण शब्दांची व त्यांच्या अर्थांचीही यथार्थ कल्पना होती.



असेच एकदा ते काकासाहेब दीक्षितांना म्हणाले की, 'वृंदावनाची पोथी' वाचीत जा. दीक्षितांना काही उमजेना. त्यांनी पुष्कळ पोथ्या बाबांना दाखविल्या परंतु बाबा त्या नाही म्हणत व 'वृंदावनाची पोथी' वाच असेच सारखे म्हणत. अखेरीस एके दिवशी अचानक दीक्षितांना एकनाथ महाराजांचे भागवत आठवले व ते त्यांनी बाबांना दाखविले. तेव्हा बाबा म्हणाले, अरे हीच तर ती पोथी ! वाच वाच यांतील शेवटच्या १ व्या अध्यायांतील ४६६ व्या ओवीत खुद्द एकनाथ महाराजांनीच या ग्रंथाला 'एकतिसां खणांचे वृंदावन' म्हटलेले जेव्हा दीक्षितांनी वाचले तेव्हा त्यांना बाबांच्या सर्वज्ञतेची खात्री पटली.

एकदा बाबा द्वारकामाईत बसले असताना नानासाहेब चांदोरकर बाबांचे चरण संवाहन करीत बसले होते व मनातल्या मनात गीतेचे श्लोक गुणगुणत होते. त्यांनी अध्याय ४ मधील ३४ वा श्लोक म्हणण्यास सुरू केले तेव्हा बाबा त्यांना म्हणाले, 'अरे नाना ! काय गुणगुणतोस रे?' त्यावर नानासाहेब म्हणाले, 'मी गीतेचा एक संस्कृत श्लोक गुणगुणत आहे.' त्यावर बाबा म्हणाले, 'तो मोठ्याने म्हण आम्हाला पण ऐकू दे.' तेव्हा नानांनी तो श्लोक म्हणून दाखविला.

**तद्विद्धि प्रणिपातेन परिप्रश्नेन सेवया ।**
**उपदेक्ष्यन्ति ते ज्ञानं ।**
**ज्ञानिनस्तत्वदर्शिनः ।।**

(भ.गीता अ.४ श्लोक ३४)

तेव्हा बाबा म्हणाले, 'याचा अर्थ सांग पाहू? नानांची नम्रपणे भाष्यकारांनी केलेला श्लोकाचा अर्थ सांगितला. तो थोडक्यात असा – तत्त्ववेत्ते ज्ञानी, त्यांना प्रणिपात केल्याने पुनःपुनः प्रश्न केल्याने आणि त्यांची सेवा केल्याने आत्मज्ञानी असे महापुरुषच तुला ज्ञानोपदेश करू शकतात कारण त्यांनी तत्त्व जाणलेले असते हे लक्षांत ठेव. बाबा म्हणाले, प्रत्येक पदाचा अर्थ सांग. त्याप्रमाणे नानांनी प्रत्येक पदाचाही अर्थ सांगितला. तेव्हा बाबा म्हणाले, तृतीय चरणातील 'ज्ञान' या पदाऐवजी तेथे दुसरे काही पद निघते का? विचार करून नाना म्हणाले, 'होय, निघते.' बाबा म्हणाले 'ते कोणते?' नाना म्हणाले 'अज्ञान'. बाबा म्हणाले, 'अज्ञान हे पद घालून अर्थ लागतो का?' नाना म्हणाले, 'नाही, शांकरभाष्य, आनंदगिरी, शंकरानंदी, श्रीधरी, मधुसूदनी, नीलकंठी, ज्ञानेश्वरी वगैरे टीकांमध्ये ज्ञान हेच पद घेऊन अर्थ केलेला आहे. त्यावर बाबा म्हणाले, म्हणजे पूर्वी केलेला अर्थ असत्य व चुकीचा आहे असे मुळीच नाही. तो सर्वमान्य आहेच हे मला ठाऊक आहे पण 'ज्ञान' शब्दाच्या ऐवजी 'अज्ञान' शब्द घेऊन अर्थ लावून पहा म्हणजे कसा यथार्थ प्रबोध होतो तो. 'ज्ञान' बोलाचा विषय नसल्याने ते उपदेश्य होत नाही.

'अज्ञान' हा वाणीचा विषय आहे. 'ज्ञान' हे शब्दातीत आहे. म्हणून 'अज्ञान' उपदेश करून स्पष्ट सांगून ते घालविणे म्हणजे ज्ञान. तिमिरनाश म्हणजे प्रकाश. द्वैत नाश म्हणजे अद्वैत. तसेच अज्ञाननाश म्हणजे ज्ञान. जशी वार गर्भाला, मल आरशाला,राख अग्नीला किंवा शेवाळं जसे पाण्याला वेष्टून असते तसेच अज्ञानाने ज्ञान आच्छादित असते. (अज्ञानेनावृतं ज्ञानम् – भ.गीता अ.५–१५) वरचे आवरण काढून घेतले म्हणजे आतील वस्तू गोचर होते.

**विश्वासाचे सत्यत्व महाभ्रम ।**
**हेंचि ज्ञानावरण तम ।।**
**निरसूनि जावे लागे प्रथम ।**
**प्रज्ञान ब्रह्म प्रगटे तैं ।।**
**संसारबीज जे अज्ञान ।**
**डोळां पडतां गुरु कृपांजन ।।**
**उडे मायेचं आवरण ।**
**उरेंतें ज्ञान स्वाभाविक ।।**
**देवां भक्तां जे भिन्नपण ।**
**हेंच मूळ अज्ञान विलक्षण ।।**
**तया अज्ञानाचे निरसन ।**
**होतांच पूर्ण ज्ञान उरे ।।**
**सारांश समूळ अज्ञान खणा ।**
**उरें ते ज्ञान सिद्ध जाणा ।।**
**ऐसे या श्लोकांचे हृद्गत अर्जुना ।**
**श्रीकृष्णराणा सुचवी ।।**

(श्रीसाईसच्चरित अध्याय ३९–९८)

बाबांनी सुचविलेले अज्ञानपद त्याची ज्ञानपदाशी सांगड घालून सुचविलेला अर्थ अत्यंत उदात्त, मार्मिक अपूर्व व मौल्यवान आहे यात शंका नाही. अशाप्रकारे बाबांच्या मुखातून गीतेच्या एका श्लोकावरच इतके सुंदर व विद्वत्तापूर्ण विवेचन ऐकून नानासाहेब भारावून गेले. त्यांनी बाबांना साष्टांग दंडवत घालून नमस्कार करून म्हणाले, 'बाबा, माझे अज्ञान दूर करा. माझा हट्टी अभिमान घालवा. आपण दयासागर आहांत तेव्हा माझ्यावर कृपेचा वर्षाव करून अज्ञानरूपी वडवानल शांत करा. एवढ्यानेच मी धन्य होईन, कृतार्थ होईन मला ज्ञानाच्या पांडित्याच्या गोष्टी नकोत.' बाबांनी संस्कृत भाषेचा कधीही अभ्यास केला नसतांना एखाद्या पंडितापेक्षाही उत्तमरितीने गीतेच्या श्लोकाचे विश्लेषण कसे केले? याचे महदाश्चर्य वाटेल यांत शंका नाही. पण संतांना ते सहज शक्य असते.

शेगांवच्या श्रीगजानन महाराजांनी तेलगी ब्राह्मणांकडून वेदमंत्र ऋचा म्हणण्यांत झालेले चूक दुरुस्त करून अस्खलीत म्हणून दाखविल्या हे सर्वश्रुत आहेच. तसेच ब्रह्मगिरी गोसाव्याला गीतेतील 'नैनं छिन्दन्ति' या श्लोकातील 'नैनं दहति पावकः' याचा अर्थ नुसता शब्दच्छल न करतां प्रत्यक्ष अनुभवाने पटवून दिले. श्रीगजानन महाराजांनी संस्कृत भाषेचा व वेदांचा अभ्यास कोठे केला होता? संतांना हे सहज शक्य असते. ते आपले ज्ञान जगाला दाखविण्यासाठी करत नाहीत. नानासाहेब हे मुंबईच्या एल्फिस्टन कॉलेजातून संस्कृत विषय घेऊन बी.ए. झाले होते. त्यांना आपल्या उच्च शिक्षणाचा अहंकार होता. अध्यात्माच्या दृष्टीने हे बरे नव्हे. म्हणून आपल्या प्रिय भक्ताचा अहंकार घालविण्यासाठी बाबांनीच ही वरील घटना घडवून आणली आणि योग्य वेळी योग्य श्लोक निवडून नानासाहेबांना निमित्तमात्र करून सर्व भक्तवृंदालाही गुरुकडून ज्ञान कसे प्राप्त करून घ्यावयाचे हे सविस्तरपणे समजावून सांगितले. अशी असे सद्गुरुची आपल्या शिष्याचे कल्याण करण्याची न्यारी रीत !!

**पाहोनि शिष्याची बद्धता ।**
**आणि कळवळा जयाचे चित्ता ।**
**कैसी लागेल देहातीतता ।**
**हेचि चिंता अहर्निश ।।**

साईसच्चरित्र अ.१० ओवी ५८)

# नवीन वर्षाचा साईमय संकल्प

सौ. मयुरी महेश कदम.

नूतन वर्षाच्या आपणा सर्वांना हार्दिक शुभेच्छा. २०१८ वर्ष पूर्ण झाले. साई समाधीला १०० वर्षे पूर्ण झाली. खरेच कमाल आहे न आपल्या श्रीसाईंची वाटतच नाही की बाबांनी समाधी घेतली आहे व तिला शंभर वर्षे होऊन गेली आहेत. श्रीसाईसच्चरित पहिल्यांदाच वाचताना हेमाडपंतांनी श्रीसाईसच्चरितात अध्याय ४२,४३,४४ मध्ये साई निर्याणाचे वृत्त सविस्तरपणे वर्णन केले आहे. ते वाचून झाल्यावर आता साईसच्चरित पूर्ण झाले असे वाटले होते. परंतु तसे ाले नाही तर ते पुढे चालूच राहिले. हेमाडपंतांनीही या संदर्भात ४५ अध्यायात म्हटले आहे की ....

**चव्वेचाळीस अध्याय पोथी ।**
**साईनिर्याण परिसिले अंती ।**
**तरीही या पोथीची प्रगती ।**
**ही काय चमत्कृती कळेना ।।**
**गताध्यायी साईनिर्याण ।**
**यथानुक्रम जाहले पूर्ण ।**
**तरी या साईलीलेची कातिण ।**
**विसंबेना क्षणभरी ।।**
**पाहू जाता नवल नाही ।**
**निर्याण केवळ देहास पाही ।**
**जन्म-मरणातीत हा साई ।**
**अव्यक्ती राही पूर्ववत ।।**
(श्रीसाईसच्चरित ओ.१६-१८)



हेमाडपंतांना त्यावेळी जे वाटले ते आताही समस्त साईभक्तांना वाटत असणार यात नवल नाही. बाबा जे शंभर वर्षांपूर्वी बोलले आहेत की ...

**झालो जरी मी गतप्राण ।**
**वाक्य माझे माना प्रमाण ।**
**माझी हाडे तुर्बतीमधून ।**
**देतील आश्वासन तुम्हास ।।**

**मी काय पण माझी तुर्बत ।**
**राहील तुम्हासवे बोलत ।**
**जो तीस अनन्य शरणागत ।**
**राहील डोलत तयासवे ।।**
**डोळ्याआड होईन ही चिंता ।**
**करू नका तुम्ही मजकरिता ।**
**माझी हाडे ऐकाल बोलता ।**
**हितगुज करिता तुम्हासवे ।।**
(श्रीसाईसच्चरित अ.२५ ओ.१०५-१०७)

बाबांची ही वचनावली आजही सत्य होत असल्याची आपण सारेचजण प्रचिती घेत आहोत. कारण बाबा प्रत्यक्ष रामाचे अवतार आहेत. श्रीरामाने दिलेले वचन पाळण्यासाठी वनवासही पत्करला. बाबाही बोलले आहेत की...

**पहा मी माझिया वचनाकारणे ।**
**मरोनि जाईन जीवे प्राणे ।**
**परि माझिया मुखींची वचनें ।**
**अन्यथा होणे नाही कदा ।।**
(श्रीसाईसच्चरित अध ४० ओ.९१)

अशा या साईंसाठी आपल्याला काय करू आणि काय नको असे होते. त्यांना फुलांनी सजवू, सोन्याने मढवू, हिरे माणिक रत्नजडित मुकुट देऊ की आणखी काय देऊ अशी मनाची अवस्था होते. पण खरे सांगावयाचे झाल्यास या सर्वांची बाबांना मुळीच आवश्यकता नाही आहे. बाबांना आवश्यकता आहे ती शुद्ध प्रेमाची. बाबा सद्‌गुरु आहेत आणि सद्‌गुरु अवाप्तकाम असतो.

**सद्‌गुरु सदा अवाप्तकाम ।**
**शिष्य काय पुरवी तत्काम ।**
**शिष्यांचाच सेवाकाम ।**
**पुरवूनि निष्काम तो करी ।।**
**भावे अर्पिता फूल पान ।**
**अति प्रेमे करील सेवन ।**
**तेच अर्पिता साभिमान ।**
**फिरवील मान जागीच ।।**
(श्रीसाईसच्चरित अ. १६ ओ. १०-११)

याचाच अर्थ काय तर सद्‌गुरुला कुठल्याही हार तुरे सोने माणके यांची गरज नाही. त्यांना गरज आहे ती शिष्याच्या शुद्ध भावनेची, शुद्ध भावनेने काहीही दिलेले सद्‌गुरुला आवडते मग ते साधे फुल असले तरी चालते फक्त भाव शुद्ध पाहिजे. श्रीकृष्णाचा परम मित्र सुदाम्याने अगदी शुद्ध भावनेने मुठभर पोहे श्रीकृष्णाला दिले असता श्रीकृष्णाने त्याला ऐश्वर्यसंपन्न केले. पोहे मुठभरच होते पण सुदाम्याची भावना मात्र कितीतरी मोठी होती.

असाच शुद्ध भाव आपल्या साईंना आपल्याकडून अपेक्षीत आहे. त्यासाठीच तर त्यांनी वेळोवेळी विविध प्रसंगी विविध मार्गांनी आपल्याला त्याची शिकवण दिली. पण आपण ती शिकवण विसरतो व ऐहिकातील मौल्यवान वस्तू त्यांना अर्पण करीत असतो. पण आपल्याजवळ सर्वात मौल्यवान असलेली वस्तू मात्र त्यांना आपण अर्पण करीत नाही. खरे पाहता आपल्याकडे असलेल्या सर्वात मौल्यवान वस्तुची जाणिव आपल्यालाही नाही आहे म्हणून आपण ऐहिक वस्तुच बाबांना देतोय.

आपल्याकडील सर्वात मौल्यवान वस्तू म्हणजे आपले निर्मळ मन, व आपला शुद्ध भाव. हो हे खरे आहे. सर्वांचेच मन निर्मळ आहे. तसेच भावही शुद्ध आहे. परंतु या ऐहिक सुखाच्या आग्नित होरपळून जाताना त्याची राख आपल्या शुद्ध निर्मळ मनावर जाऊन त्याचे पापुद्रे त्यावर बसले गेले आहेत आणि आपले निर्मळ मन व शुद्ध भाव त्यामुळे त्याखाली अडकले गेले आहेत.

**वार वेष्टी गर्भासी ।**
**अथवा मल आदर्शासी ।**
**विभूति आच्छादी वन्हीसी ।**
**तैसेंच ज्ञानासी अज्ञान ।।**
(श्रीसाईसच्चरित अ. ३९ ओ.५९)

अशा प्रकारे आपले शुद्ध मनही या प्रपंचाच्या जंजाळात आणि ऐहिकाच्या सुखाच्या दिपाच्या काजळीत झाकोळून गेले आहे. ते पूर्ववत करणे गरजेचे आहे. तसे केले तरच आपण आपल्याकडील हा मौल्यवान ऐवज आपल्या प्रिय बाबांना अर्पण करू शकतो.

**तेजःपुंज एकादे रत्न ।**
**जाता केरा-मातीत दाटून ।**
**गेली वर्षाची वर्षे लोटून ।**
**बुजाले स्मरण तयाचें ।।**
**कर्मधर्मसंयोगप्राप्ती ।**
**कदाकाळी लागता हाती ।**
**वाटे हरपली समूळ दीप्ती ।**
**दगड-माती संगती ।।**
**पुढे ते स्वच्छ घासता ।**
**वरील काटमाती जाता ।**
**पावे ते पूर्वील तेजःपुंजता ।**
**तैसीच अवस्था ज्ञानाची ।।**
**माती-काट तें अज्ञान ।**
**याच अज्ञानें आवृत्त ज्ञान ।**
**करता काट-मातीचे निरसन ।**
**उजळेल रत्न सहजेंच ।।**

(श्रीसाईसच्चरित अ.५० ओ.१७३-१७६)

जसे एखादे मौल्यवान रत्न केर मातीच्या अच्छादनाने लपले गेले व कधी काळी नशिबाने सापडल्यावर त्यावरील धूळ माती काढली असता ते पूर्वी एवढेच लखलखीत तेजःपुंज दिसते. तसेच आपल्या निर्मळ मनाचे व शुद्ध भावनेचे आहे. ते आता झाकोळले गेले आहे पण त्यावरील ऐहिक सुखाच्या अभिलाषेचे पापुद्रे आपण काढले तर ते पहिल्यासारखेच निर्मळ व शुद्ध होणार यात तिळमात्रही शंका नाही.

आता आपण म्हणाल हे कसे शक्य आहे? तर येथे सर्वप्रथम एक गोष्ट लक्षात घ्या की श्रीसाईंच्या भक्ताला कुठलीही गोष्ट अशक्य नाही. पण त्यासाठी प्रामाणिक पणा हवा. जर आपण प्रामाणिकपणे मन निर्मळ करण्याचा प्रयत्न केला तर त्यात आपण नक्कीच यशस्वी होऊ. हे मन आणि भावना यावरील साचलेले पापुद्रे केवळ साईशिकवणीच्या आचरणाने निघून जाणारे आहेत. त्याशिवाय त्याला दुसरा पर्याय नाही. जर खरोखरच आपल्याला आपले मन व भावना शुद्ध करावयाची असेल तर आपण आपल्या श्रीसाईंनी सांगितल्याप्रमाणे आपले आचरण करूया.

चला तर आपण आता नवीन वर्षाचा संकल्पच करूया की आता यापुढ जीवन जगताना मी माझ्या साईमाऊलींच्या शिकवणीचे आचरण करेन.

आपल्या श्रीसाईबाबांनी आपल्याला कधीच किचकट, गुंतागुंतीची शिकवण दिलेली नाही. त्यांनी आपल्याला झेपेल अशा पद्धतीनेच आपल्याला सोप्यात सोपी शिकवण दिलेली आहे. कारण ....

**समर्थ साई ज्ञाननिधी ।**
**जया भक्ताची जैसी बुद्धी ।**
**आधीं निर्धारून पात्रशुद्धी ।**
**ज्ञानसमृद्धी वितरत ।।**
**तयास पूर्ण अंतर्ज्ञान ।**
**तयास आधीच सर्वांची जाण ।**
**जयास जैसे योग्य साधन ।**
**तयाचे नियमन तैसेंच ।।**
**जैसा जयाचा अधिकार ।**
**तयाचा आधींच करूनि विचार ।**
**योग्यायोग्यतेनुसार ।**
**भक्तांचा भार बाबांना ।।।**

(श्रीसाईसच्चरित अ.१७ ओ.१५४-१५६)

बाबांना माहित आहे की या कलियुगात आपल्या साध्या भोळ्या भक्तांना, संसारात ग्रस्त असलेल्यांना कर्मठ अनुष्ठान, ज्ञानमार्ग, ध्यानमार्ग जमणार नाहीत व पेलवणारही नाहीत. त्यांच्यासाठी

सोपा भक्तमार्ग त्यांनी सांगितला आणि त्यातही नामस्मरणाची महती सांगितली. या नामस्मरणाने मन निर्मळ तर बनते. भाव शुद्ध होतो अगदी संपूर्ण जीवनाचा कायापालट होतो. रामनामस्मरणाने वाल्याचा नाही का वाल्मिकी झाला?

**केवढी या नामाची महती ।**
**वर्णिलीसे संतमहंती ।**
**काय म्यां पामरें ती वानावी किती ।**
**स्वरूपप्राप्ती येणेनी ।।**
**हीं दो अक्षरें उलटी स्मरला ।**
**तो कोळी वाटपाड्याही उद्धरला ।**
**वाल्याचा वाल्मिक होऊनि गेला ।**
**वाक्सिद्धी पावला नवलाची ।।**
**''मरा, मरा'' उलटें म्हणतां ।**
**राम प्रकटला जिव्हेवरता ।**
**जन्माआधीच अवतारचरिता ।**
**जाहला लिहिता रामाचे ।।**

(श्रीसाईसच्चरित अ.१९ ओ. १८१-१८३)

म्हणजे आपल्या इष्ट देवताच्या नामस्मरणाने आपल्या जीवनाचा कसा सर्वांगी सुंदर कायापालट होतो हे यावरून दिसते.

नामस्मरणाने जर जीवनात परिवर्तन घडून येते तर त्यामुळे आपले मन निर्मळ होणार यात शंकाच नाही.

**नाम प्रयत्नें घेतां चोखट ।**
**अप्रयत्नेंही नाही ओखट ।**
**मुखासी आलें जरी अवचट ।**
**प्रभाव प्रकट करील ।।**
**नामापरीस सोपे आन ।**
**अंतःशुद्धीस नाहीं साधन ।**
**नाम जिव्हेंचे भूषण ।**
**नाम पोषण परमार्थ ।।**
**नाम घ्यावया नलगे स्नान ।**
**नामासी नाही विधिविधान ।**
**नामें सकळपापनिर्दळण ।**
**नाम पावन सर्वदा ।।**

(श्रीसाईसच्चरित अ. २७ ओ. ८७-८९)


एकदा का मन निर्मळ झाले, मनीचा भाव शुद्ध झाला की आपोआपच आपल्यातील अहंकार निघून जाणार, सर्वांभूती ईश्वराचा अंश आहे याची जाणिव होऊन सर्वांबद्दल प्रेम निर्माण होणार, लोभ, मोह, मत्सर सारख्या षड्रिपुंवर नकळत आघात होऊन ते आपल्यामधून बाहेर पडणार यामुळे आपल्या मुळात शुद्ध असलेल्या मनावर व भावनांवरील बसलेले पापुद्रे हळू हळू गळून पडणार व मन शुद्ध होणार आणि हे अति मौल्यवान शुद्ध मन आपण आपल्या श्रीसाईंना अर्पण केल्याने आपले साई आपल्यावर प्रसन्न होऊन आपल्या जीवनाचे सार्थक करणार. यात तिळमात्रही शंका नाही.

तेव्हा आपल्या नामस्मरणाची आवड निर्माण होण्यासाठी आपल्या आवडीच्या आपल्या श्रीसाईंचे नामस्मरण करणे आपल्यासाठी अगदी सोपे आहे नाही का? आणि श्रीसाईही बोलले आहेत की ...

**अखंड माझेंही नाम घेतां ।**
**बेडा पार होईल तत्त्वता ।**
**नलगे कांही इतर साधनता ।**
**मोक्ष हाता चढेल ।।**
**जया माझे नामाची घोकणी ।**
**झालीच तयाचे पापाची धुणी ।**
**तो मज गुणियाहूनि गुणी ।**
**जया गुणगुणी मन्नामी ।।**

(श्रीसाईसच्चरित अ. २७ ओ. ९०-९१)

किती सोपे आहे नाही का हे? चला तर मग आपण या नविन वर्षापासून आपल्या श्रीसाईंचे नामस्मरण करूया व सर्वार्थाने व सर्वांगाने निर्मळ परिपूर्ण होऊन या कलियुगात स्वच्छंद जीवन जगूया. हाच या नवीन वर्षाचा आपला संकल्प करूया. ओम साईराम।



संक्रांत-रथसप्तमी निमित्त

# कशेळीचे कनकादित्य सूर्यमंदिर

भारतात सूर्यमंदिरे फारच कमी आहेत. सौराष्ट्रात वेरावळ जवळ प्रभास पट्टण येथे प्राचीन सूर्यमंदिर आहे. उत्तर प्रदेश, मध्यप्रदेश, कोणार्क, ओरिसा, नेपाळ या भागात काही ठिकाणी सूर्यमंदिरे आहेत. रत्नागिरी जिल्ह्यात राजापूर तालुक्यात कशेळी गावातील कनकादित्य मंदिर हे प्रसिद्ध व सर्वात मोठे देवालय आहे. **कनकादित्य म्हणजे सूर्यनारायण**. रत्नागिरी व राजापूर या दोन्ही शहरांच्या मध्यभागी सुमारे ३०/३२ कि.मी. अंतरावर कशेळी गाव आहे. गावचे भूषण कनकादित्य मंदिर गावाच्या मध्यभागी विस्तीर्ण सपाट प्रदेशात बांधले गेले आहे. या मंदिराला उज्ज्वल अशी ऐतिहासिक पार्श्वभूमी असून मंदिरातील जी आदित्याची मूर्ती आहे ती सुमारे १००० वर्षांपूर्वी सोमनाथ नजिकच्या प्रभासपट्टण क्षेत्रात असलेल्या सूर्यमंदिरातून आणली गेली असावी. प्रभासपट्टण हे भगवान श्रीकृष्णांचे वसतीस्थान. कशेळी गावी या



आदिदेव नमस्तुभ्यं प्रसीद मम भास्कर । दिवाकर नमस्तुभ्यं प्रभाकर नमोस्तुते ।।

मूर्तीचे आगमन कसे झाले याबद्दल येथे प्रचारात असलेल्या दंतकथा अशा आहेत.

काठेवाडातील वेरावळ बंदरातून कोणी नावाडी माल घेऊन दक्षिणेकडे चालला होता. त्याच गलबतात

ही आदित्याची मूर्ती होती. त्याचे जहाज कशेळी गावच्या समुद्रकिनाऱ्यासमोर आल्यावर एकदम थांबले. ते पुढेही जाईना व मागेही जाईना. शेवटी अनेक प्रयत्नांनंतर त्याचे मनात असे आले की, जहाजावर जी आदित्याची मूर्ती आहे तिला इथेच स्थायिक होण्याची इच्छा आहे. मग त्याने होडीमधील ती मूर्ती उतरून कशेळीच्या किनाऱ्यावर आणून ठेवली. कशेळीच्या समुद्रकिनाऱ्यावर एक नैसर्गिक गुहा काळ्या दगडाच्या खडकात निर्माण झालेली आहे. (क्षेत्रफळ अंदाजे ४०० चौ. फू.) त्या गुहेत नावाड्यझाने ही मूर्ती आणून ठेवली त्यानंतर त्याचे जहाज लगेच चालू झाले. कशेळीला मंदिरात त्या मूर्तीची स्थापना कशी झाली त्याची अख्यायिका अशी, कशेळीला कनका नावाची सूर्योपासक राहत असे. तिला ही मूर्ती समुद्रावरील गुहेत आणून ठेवल्याचे स्वप्न पडले की, मी समुद्र किनाऱ्यावर येऊन राहिलो आहे. तू मला गावात नेऊन माझी स्थापना करून मंदिर बांध. कनकाबाईने नंतर गावकऱ्यांना बोलावून ही हकीकत सांगितली. ग्रामस्थ मंडळींना समुद्रावर जाऊन तपास करताना तेथील गुहेत ही मूर्ती दिसली. त्यांनी नंतर समरंभापूर्वक वाजत गाजत गावात आणली. पुढे कनकेने गावकऱ्यांच्या मदतीने मंदिर बाधून तिची स्थापना केली. मूर्ती ज्या गुहेत सापडली त्या गुहेला देवाची खोली असे नाव नंतर पडले.



गोविंद भट्ट भागवतांची किर्ती ऐकून पन्हाळगडचा शिलाहारराजा आषाढ शु. ४ शके ११३३ तारीख २७.६.११९१ रोजी संक्रांतीच्या पर्वकाळी समुद्र स्नानासाठी कशेळीला आला असताना कशेळी गावात दररोज १२ ब्राह्मणांना भोजन घालण्यासाठी येणाऱ्या खर्चाकरिता कशेळीतील गोविंद भट्ट भागवतांना हा गाव इनाम दिला. त्याबद्दलचा ताम्रपट कनकादित्य मंदिरात आहे. गोविंद भट्ट कनकादित्याचे पुजारी होते. आज तारखेलाही गोविंद भट्टांचे भागवत कुलोत्पन्न वंशज विश्वस्त आहेत. कनकादित्य हे जागृत देवस्थान असून त्याची ख्याती सर्वदूर पसरली आहे. मुंबई, पुणे, कोल्हापूर, अमरावती, बेळगाव, हुबळी, धारवाड, उज्जैन, ग्वाल्हेर, इंदूर येथून दरवर्षी भक्तगण येत असतात व देवाच्या पायी लीन होत असतात. ही देवता भक्तांची मनोकामना पूर्ण करते असा सर्वांना अनुभव आहे. माघ शु. सप्तमी ते माघ शु. एकादशी असा ५ दिवस मंदिरात रथसप्तमीचा उत्सव असतो.

(कशेळी हे गाव पावस, रत्नागीरीच्या जवळ आहे.)



## संक्रांत-रथसप्तमी निमित्त

# ।। श्री सूर्यस्तुती ।।

जयाच्या रथा एकची चक्र पाही । नसे भूमि आकाश आधार काही
असे सारथी पांगुळा ज्या रथासी । नमस्कार त्या सूर्यनारायणासी ।।१।।
करी पद्ममाथा किरीटी झळाळी । प्रभा कुंडलांची शरीरा निराळी ।
पहा रश्मि ज्याची त्रिलोकासि कैसी । नमस्कार त्या सूर्यनारायणासी ।।२।।
सहस्त्र द्वये दोनशे आणि दोन । क्रमी योजने जो निमिशार्थतेन ।
मना कल्पवेना जयाच्या त्वरेसी । नमस्कार त्या सूर्यनारायणासी ।।३।।
विधी वेद कर्मासि आधार कर्ता । स्वधाकार स्वाहादि सर्वत्र भोक्ता ।
असे अन्नदाता समस्ता जनांसी । नमस्कार त्या सूर्यनारायणासी ।।४।।
युगे मंत्र कल्पांत ज्याचे नी होती । हरी ब्रह्म ऋद्रादी ज्या बोली जेती ।
क्षयांती महाकाळ रुप प्रकाशी । नमस्कार त्या सूर्यनारायणासी ।।५।।
शशी तारका गोवुनी जो ग्रहांत । त्वरें मेरू वेष्टोनीयां पूर्वपंथे ।
भ्रमे जो सदा लोकरक्षावयांसी । नमस्कार त्या सूर्यनारायणासी ।।६।।
समस्ता सुरा माजि तू जाणचर्या । म्हणोनीच तु श्रेष्ठ त्या नाम सुर्या ।
दुजा देव तो दाखवी स्वप्रकाशी । नमस्कार त्या सूर्यनारायणासी ।।७।।
महा मोह तो अंधःकारासी नाशी । प्रभा शुद्ध सत्वाची अज्ञान नाशी ।
अनाथां कृपा जो करी नित्य ऐसी । नमस्कार त्या सूर्यनारायणासी ।।८।।
कृपा ज्यावरी होय त्या भास्कराची । न पाहूं शके शत्रू त्याला विरंची ।
उभ्या राहती सिद्धी होऊनी दासीं । नमस्कार त्या सूर्यनारायणासी ।।९।।
फळें चंदने आदी पुष्पे करोनी । पूजावे बरे एक निष्ठा धरोनी ।
मनी इच्छिले पाविजे त्या सुखासी । नमस्कार त्या सूर्यनारायणासी ।।१०।।
नमस्कार साष्टांग बापा स्वभावे । करोनी तया भास्करा लागि घ्यावे ।
दारिद्रे सहस्त्रादी जो क्लेश नाशी । नमस्कार त्या सूर्यनारायणासी ।।११।।
वरी सूर्य आदित्य मित्रादी भानू । विवस्वान इत्यादिही पाद रेणू ।
सदा वांछिती पूज्य ते शंकरासी । नमस्कार त्या सूर्यनारायणासी ।।१२।।

साई अनुभव

### जुन्या साईलीलातील अमृत ठेवा

# ‘माझ्यासाठी उदी व प्रसाद पाठवतील’



कै. बाळकृष्ण विश्वनाथ देव (‘बाबांचे बाळ’) यांचे पुत्र श्रीपादराव हे आपल्या पिताजींचे मागे बरीच वर्षे शिरडी संस्थानचे विश्वस्त होते. १९५२ मध्ये त्यांना भयंकर स्वरूपाचा अपघात झाला. दोन्ही पाय व दोन्ही हात जायबंदी झाले व क्लोरोफॉर्म देऊन सर्व इलाज करावे लागले. शुद्धीवर आल्यानंतर ते विचार करीत पडलेले असताना एके दिवशी त्यांना १९०२ मधील एका घटनेची आठवण झाली. जामनेरचे श्री.चांदोरकर यांची मुलगी मैनाताई प्रसूतीच्या वेळी अडली होती व जीवावर बेतले होते. अशा वेळी श्री. चांदोरकरांनी बाबांची करुणा भाकली. त्यांना वाटले की, जर या वेळी बाबांच्या हातची उदी मिळेल तर किती बरे होईल? मैनाताई नक्की सुटेल. नेमके त्याच वेळी शिरडीत बाबांनी बापूगीर गोसाव्याला प्रेरणा करून जामनेरास पाठविले व नानांना (चांदोरकर) उदी पोचती केली. याच घटनेची पुनरावृत्ती कशी झाली याबद्दल रा. श्रीपादराव लिहितात....

दवाखान्यात असताना दुसरा उद्योग नव्हता. एका स्थितीत पडून राहायचे. बाबांचे नामस्मरण करावयाचे. श्री.शांताराम भाऊ तेलंग दररोज दवाखान्यात मला भेटायला येत. त्यांना मी म्हटले, ‘‘१९५२ साली आपण इतके भाग्यवान असू का, की १९०२ साली बाबांनी नानांकडे जामनेरास उदी पाठविली त्याप्रमाणे ते शिरडीहून इथे माझ्याकडे उदी व प्रसाद पाठवतील.’ शांताराम भाऊ म्हणाले, ‘जरूर पाठवतील. तुम्ही ज्या बाळकृष्णपंतांचे पुत्र, त्यांची योग्यता केवढी आणि शिवाय तुम्ही बाबांचे शिकवणीप्रमाणे वागत आहात, तर तुमच्याकरिता जरूर बाबा उदीप्रसाद पाठवतील.’

सर्वव्यापी महाराजांनी, समाधिस्थ झाल्यानंतर ३४ वर्षांनी, आमचे हे बोलणे शिरडीत बसून ऐकले. कारण नगरहून मुंबईला परत येत असलेले माझे मित्र श्री.शंकरराव लाठोरे यांना फक्त पाच मिनिटे समाधीचे दर्शन घेण्याची प्रेरणा बाबांनी केली. श्री.शंकरराव दर्शन घेत असता संस्थान गवई श्री.विठ्ठलराव मराठे यांनी त्यांचेजवळ श्रीपादरावांबद्दल चौकशी केली. श्री. शंकररावांकडून सर्व हकिकत कळल्यावर व आता शंकरराव मुंबईसच निघाले आहेत, असे समजल्यावर विठ्ठलरावांनी त्यांचेजवळ लगबगीने बाबांच्या

उदीप्रसादाची पुडी दिली व म्हटले की, ''हा उदीप्रसाद ताबडतोब बाबू (श्रीपादराव) यांना नेऊन द्या.'' त्याप्रमाणे श्री.शंकरराव ताबडतोब मुंबईस आले व मी बोलल्यानंतर दुसरेच दिवशी बाबांनी शिरडीहून पाठविलेला उदीप्रसाद मला आणून दिला.

अशा रीतीने महाराजांनी एका साध्या भक्ताकरिता धाव घेऊन, उदीप्रसाद पाठवून त्याच्या मनाचे समाधान करावे व त्यास जणू आश्वासन द्यावे की, ''अरे, मी तुझ्या पाठीशी असताना घाबरण्याचे कारण काय?'' हे केवढे समाधान आहे.

ती उदी व प्रसाद पाहून माझी व तेथे असलेल्या मंडळींची काय स्थिती झाली, याचे वर्णन करण्यास माझी लेखणी असमर्थ आहे. महाराजांची सेवा कधी फुकट जात नाही, हेच या अनुभवाचे सार होय !

– श्रीपाद बाळकृष्ण देव

साई अनुभव

# 'मी तर मस कामास येईन'



एकदा मी महाराजांचे जवळ बसलो होतो. महाराज एकसारखे कण्हताना दिसले. महाराजांची व्यथा पाहून मी मनात तळमळू लागलो. शेवटी मी त्यांना म्हटले, ''बाबा, आपल्याला फार त्रास होत आहे आणि आम्ही आपल्याला कोणत्याही प्रकारे उपयोगी पडू शकत नाही.'' त्यावर महाराजांनी एवढेच म्हटले की, ''मी तर मस कामास येईन.'' दुसऱ्या दिवशी मला मुंबईस येण्याची आज्ञा झाली व मी मुंबईस आलो. मी येथे आल्यावर नागपूरहून वडीलबंधू आजारी असल्याचे पत्र आले व त्यांना भेटण्यासाठी मी नागपुरला गेलो. तेथे बसल्यावर महाराजांचे कण्हण्याचा व शब्दांचा उलगडा झाला. तो सर्व उलगडा मी नागपूरहून एका स्नेह्याला लिहिलेल पत्रावरून वाचकांच्या ध्यानात स्पष्टपणे येईल. म्हणून त्या पत्राचा उतारा खाली देत आहे.

लिहिण्यास आनंद वाटतो की, ती. भाईजीसाहेब यांची प्रकृती कालपासून थोडी थोडी सुधारत आहे. आदितवारचा दिवस फार वाईट गेला. मला तार पाठविण्याविषयी त्यांनी सांगितले. पण लवकरच डॉक्टर आले व त्यांना तार करू नका म्हणाले. तितक्यात परमदयाळू बाबांनीही दर्शन दिले व त्याच रात्री त्यांचे एका स्नेह्यास तशाच अर्थाचा दृष्टांत दिला. ''मी मस कामास येईन'' हे शब्द ज्या दिवशी बाबांनी मजजवळ उच्चारले तोच तो दिवस. काय तो कनवाळूपणा, किती अगाध शक्ती ! ''अनंता मुखींचा शिणे शेष गाता'', हे खोटे नाही. आम्हा मूढ जीवांना ते कण्हताना दिसतात. पण त्याच वेळेला ते कोठे काय करीत असतात, हे त्यांचे त्यांनाच ठाऊक. त्यांचे पाय मला लाधले, हे खरोखरच माझे मोठे भाग्य. ते जन्माजन्मांतरीसुद्धा अंतरू नयेत, हीच माझी प्रार्थना आहे.

– कै. हरि सीताराम दीक्षित

उपाध्यक्ष चंद्रशेखर कदम यांचे निवेदन

## दि.२२ डिसेंबर ते दि.०१ जानेवारी २०१९ याकालावधीत

# ९.५० लाख साईभक्तांनी साई समाधीचे दर्शन घेतले...



श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीच्या वतीने नाताळ सुट्टी, चालू वर्षाला निरोप व नवीन वर्षाचे स्वागतानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या शिर्डी महोत्सवाच्या दिनांक २२ डिसेंबर २०१८ ते दिनांक ०१ जानेवारी २०१९ याकालावधीत सुमारे ९.५०लाख साईभक्तांनी श्री साईबाबांच्या समाधीचे दर्शन घेतले तर याकालावधीत सुमारे १४.५४ कोटी रुपये देणगी प्राप्त झाली असल्याची माहिती **संस्थानचे उपाध्यक्ष चंद्रशेखर कदम यांनी दिली.**

श्री.कदम म्हणाले, नाताळ सुट्टी, चालू वर्षाला निरोप व नवीन वर्षाचे स्वागतानिमित्त दिनांक २२ डिसेंबर २०१८ ते दिनांक ०१ जानेवारी २०१९ याकालावधीत १,७४,४६७ भाविकांनी सशुल्क दर्शन पासेसव्दारे, ६,६२,४०६ भाविकांनी बायोमेट्रीकव्दारे व १,१४,०५६ भाविकांनी मुखदर्शनाव्दारे असे सुमारे ९.५० लाख साईभक्तांनी श्री साईबाबांच्या समाधीच्या दर्शनाचा लाभ घेतला आहे. तसेच दानपेटीतून ८.०५ कोटी रुपये, देणगी काउंटरव्दारे ३.०३ कोटी रुपये, डेबीट क्रेडीट कार्ड, ऑनलाईन देणगी, चेक/डिडी, मनी ऑडर आदींव्दारे ३ कोटी रुपये देणगी रक्कम स्वरुपात प्राप्त झालेली आहे. तसेच सोने ५०७ ग्रॅम (रुपये १४.२८ लाख) व चांदी १६.५ कि.ग्रॅम (रुपये ४.८२ लाख), सुमारे १९ देशांमधुन परदेशी चलनाव्दारे ३०.६३ लाख रुपये देणगी प्राप्त झालेली आहे. याशिवाय याकाळात सशुल्क व ऑनलाईन दर्शन पासेसव्दारे ३ कोटी ६२ लाख ९१ हजार रुपये देणगी शुल्क प्राप्त झाले आहे.

तसेच शिर्डी महोत्सवाच्या कालावधीत श्री साईप्रसादालयात ६,०७,४८४ साईभक्तांनी प्रसाद भोजनाचा लाभ घेतला व १,२४,९७४ साईभक्तांनी अन्नपाकीटांचा लाभ घेतला. याबरोबरच ६,३४,७५८ लाडु पाकीटांची विक्री करण्यात आली असून याव्दारे १,५८,६८,९५०/- रुपये प्राप्त झाले आहे. तर ९,४१,२०० मोफत बुंदी प्रसाद पाकीटांचे दर्शनरांगेतून साईभक्तांना वाटप करण्यात आले.

तसेच याकालावधीत साईआश्रम भक्तनिवास, व्दारावती भक्तनिवास, साईधर्मशाळा, श्री साईबाबा भक्तनिवास्थान (५०० रुम) व साईप्रसाद निवास आदी निवास्थानांव्दारे १,८२,३२१ साईभक्तांची निवासाची व्यवस्था करण्यात आली. तर अतिरिक्त निवास व्यवस्थेसाठी उभारण्यात आलेल्या मंडपात २१,०९७ अशी एकुण २,०३,४१८ साईभक्तांची निवासाची व्यवस्था करण्यात आलेली होती असे श्री.कदम यांनी सांगितले.

# नविन 3 Tesla MRI मशिनचे उदघाटन

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) च्या श्री साईबाबा हॉस्पिटल मध्ये सुमारे १५ कोटी ६० लाख ५१ हजार ५९७ रुपये किंमतीच्या नविन 3 Tesla MRI मशिनचे उदघाटन संस्थानचे अध्यक्ष डॉ.सुरेश हावरे यांच्या शुभ हस्ते करण्यात आले.

याप्रसंगी संस्थानच्या मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती रुबल अग्रवाल, विश्वस्त भाऊसाहेब वाकचौरे, विश्वस्त तथा नगराध्यक्षा सौ.योगिताताई शेळके, सौ.नलिनी हावरे, उपजिल्हाधिकारी धनंजय निकम, मनोज घोडे पाटील, उपकार्यकारी अधिकारी बाबासाहेब घोरपडे, वैद्यकीय संचालक डॉ.विजय नरोडे, वैद्यकीय प्रशासक डॉ.प्रितम वडगावे, प्रशासकीय अधिकारी अशोक औटी, रेडीओलॉजीस्ट डॉ.व्यवहारे व डॉ.नागरे आदी मान्यवर उपस्थित होते.

श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये जुने असलेले १.५ Tesla MRI मशिन बदलुन त्याजागी सुमारे १५ कोटी ६० लाख ५१ हजार ५९७ रुपये किंमतीचे अत्याधुनिक असे ३ Tesla MRI मशिन बसविण्यात आलेले असून त्याचा शुभारंभ संस्थानचे अध्यक्ष



**3 Tesla MRI मशिनचे उदघाटन संस्थानचे अध्यक्ष डॉ.सुरेश हावरे यांच्या शुभ हस्ते करण्यात आले. याप्रसंगी संस्थानच्या मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती रुबल अग्रवाल, विश्वस्त भाऊसाहेब वाकचौरे, विश्वस्त तथा नगराध्यक्षा सौ.योगिताताई शेळके, सौ.नलिनी हावरे, उपजिल्हाधिकारी धनंजय निकम, मनोज घोडे पाटील, उपकार्यकारी अधिकारी बाबासाहेब घोरपडे, वैद्यकीय संचालक डॉ.विजय नरोडे, वैद्यकीय प्रशासक डॉ.प्रितम वडगावे, प्रशासकीय अधिकारी अशोक औटी, रेडीओलॉजीस्ट डॉ.व्यवहारे व डॉ.नागरे आदी मान्यवर उपस्थित होते.**



डॉ.सुरेश हावरे यांच्या हस्ते करण्यात आला. हे मशिन अहमदनगर व नासिक जिल्ह्यातील सर्वात अद्यावत असलेले एकमेव मशिन असून पुर्वीच्या मशिन पेक्षा जास्त वेगवान व नविन तंत्रज्ञान प्रणाली असलेले मशिन आहे. या मशिनव्दारे तपासणी ही जुन्या दरात केली जाणार असून या मशिनव्दारे मेंदु, मणके, स्तन प्रोस्टेट व यकृत या अवयवांच्या संबंधीत रोग निदानासाठी उपयोगी ठरणार आहे. तसेच या नवीन मशिनमुळे मानवाच्या सर्वच अवयवांचे अचुक स्कॅनिंग करता येणे शक्य होणार आहे.

श्री साईबाबा व श्री साईनाथ या रुग्णालयाकरीता मागिल एका वर्षात १०० विविध प्रकारच्या मशिनरी बसविण्यात येवून कार्यान्वीत करण्यात आलेल्या आहे. यामध्ये कॅथलॅब, सिटी स्कॅन, एम.आर.आय मशिन, कलर डॉप्लर, डायलेसिश, ओटी टेबल, मल्टीपॅरा मॉनिटर आदि मशिनरींचा समावेश आहे. तर एक्सरे, मॉरचुरी कॅबिनेट, व्हिडीओ गॅस्ट्रोस्कोप व अत्याधुनिक शस्त्रक्रिया करणेसाठीचे टेबल असे एकुण १० नवीन मशिन येत्या दोन महिन्यात कार्यान्वीत करण्यात येतील.

## श्री.धनंजय मुंडे, विरोधी पक्षनेते, महाराष्ट्र राज्य यांनी श्री साईबाबांच्या समाधीचे दर्शन घेतले.



**श्री.धनंजय मुंडे, विरोधी पक्षनेते, महाराष्ट्र राज्य यांनी श्री साईबाबांच्या समाधीचे दर्शन घेतले. यावेळी संस्थानच्या मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती रुबल अग्रवाल उपस्थित होत्या.**

# श्री.शिवराज सिंह चौहान, माजी मुख्यमंत्री, मध्यप्रदेश यांनी नववर्षानिमित्त श्री साईबाबांच्या समाधीचे दर्शन घेतले.



श्री.शिवराज सिंह चौहान, माजी मुख्यमंत्री, मध्यप्रदेश यांनी नववर्षानिमित्त श्री साईबाबांच्या समाधीचे दर्शन घेतले. यावेळी संस्थानचे अध्यक्ष डॉ.सुरेश हावरे उपस्थित होते.



श्री. शिवराज सिंह चौहान, माजी मुख्यमंत्री, मध्यप्रदेश यांनी नववर्षानिमित्त श्री साईबाबांच्या समाधीचे दर्शन घेतल्यानंतर त्यांचा सत्कार करताना संस्थानचे अध्यक्ष डॉ.सुरेश हावरे.

शिर्डी वृत्त

**श्री.दिपक केसरकर, राज्यमंत्री, गृह वित्त व नियोजन (ग्रामिण), महाराष्ट्र राज्य यांनी नववर्षानिमित्त श्री साईबाबांच्या समाधीचे दर्शन घेतले.**



**नववर्षानिमित्त श्री साईबाबांच्या समाधीच्या दर्शनासाठी झालेली भाविकांची गर्दी.**





# सुमारे २३.८१ कोटी रुपये खर्चाच्या कामाचा शुभारंभ



श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डीमार्फत वाढीव शिर्डी संस्थान, कोपरगांव नगरपालिका व शिर्डी नगरपंचायत संयुक्त पाणी पुरवठा योजना टप्पा क्र.१ च्या सुमारे २३.८१ कोटी रुपये खर्चाच्या कामाचा शुभारंभ संस्थानचे अध्यक्ष डॉ.सुरेश हावरे यांच्या शुभहस्ते करण्यात आला.

याप्रसंगी संस्थानच्या मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती रुबल अग्रवाल, विश्वस्त भाऊसाहेब वाकचौरे, विश्वस्त तथा नगराध्यक्षा सौ.योगिताताई शेळके, उपजिल्हाधिकारी धनंजय निकम, मनोज घोडे पाटील, उपकार्यकारी अधिकारी बाबासाहेब घोरपडे, पोलिस उपअधिक्षक आनंद भोईटे, प्रशासकीय अधिकारी सर्वश्री डॉ.आकाश किसवे, सुर्यभान गमे, दिलीप उगले, अशोक औटी, पाणी पुरवठा विभाग प्रमुख राजेंद्र जगताप आदी उपस्थित होते.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीस सध्या पाणी पुरवठा मौजे-कनकुरी शिवारातील साठवण तलावातून करण्यात येत आहे. हे जल शुध्दीकरण केंद्र २५ वर्षा पूर्वीचे आहे. सध्याची पाण्याची मागणी पाहता या तलावाची क्षमता व जल शुध्दीकरण केंद्राची कार्यक्षमता अपूरी पडत आहे. त्याचप्रमाणे साठवण तलाव ते संस्थान परिसरात सर्व पाईपलाईन जीर्ण झाल्याने पाण्याची गळती होवून पाण्याचा अपव्यय होत आहे. तसेच जलकुंभाजी संख्या कमी असल्याने संस्थान परिसरातील सर्व ठिकाणी सारख्या दाबाने पाणी पुरवठा करता येत नाही. यासाठी वाढीव शिर्डी संस्थान, कोपरगांव नगरपालिका व शिर्डी नगरपंचायत संयुक्त पाणी पुरवठा योजनेअंर्तगत टप्पा - ०१ च्या कामास शासनाची मान्यता मिळाली असून याकरीता २३.८१ कोटी रुपये खर्च अपेक्षीत आहे.

त्यानुसार वाढीव शिर्डी संस्थान, कोपरगांव नगरपालिका व शिर्डी नगरपंचायत संयुक्त पाणी पुरवठा योजनेच्या टप्पा क्र.०१ च्या अंर्तगत जल शुध्दीकरण केंद्र, जल शुध्दीकरण केंद्र ते संस्थान परिसरातील सर्व पाईप लाईन, पाण्याचे हौद व जल कुंभाची उभारणी करणेच्या कामाचा शुभारंभ आज संस्थानचे अध्यक्ष डॉ.सुरेश हावरे यांच्या हस्ते करण्यात आला असून येत्या १८ महिन्यात काम पुर्ण करण्यात येणार आहे.



# ‘साई रुग्णवाहिका प्रकल्प’




श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) च्या वतीने राज्यातील ग्रामीण व दुर्गम भागातील गरजू रुग्णांना तात्काळ वैद्यकीय सेवा उपलब्ध करुन देण्यासाठी महाराष्ट्रातील आरोग्य क्षेत्रात/रुग्णसेवेच्या क्षेत्रात कार्यरत असलेल्या नोंदणीकृत स्वयंसेवी संस्थांना प्रत्येकी एक याप्रमाणे सुमारे ५०० रुग्णवाहिका उपलब्ध करुन देवून ‘साई रुग्णवाहिका प्रकल्प’ राबविण्यासाठी येणा-या रुपये २५ कोटी खर्चास शासनाने मान्यता दिली असल्याची माहिती संस्थानचे अध्यक्ष डॉ.सुरेश हावरे यांनी दिली.

डॉ. हावरे म्हणाले, साई रुग्णवाहिका प्रकल्पामुळे राज्यातील ग्रामीण आणि दुर्गम भागातील रुग्णांना संस्थानच्या माध्यमातून उपलब्ध होणा-या रुग्णवाहिकांमुळे तातडीने वैद्यकीय सुविधा मिळणे शक्य होणार आहे. परिणामी श्री साईबाबांचा रुग्ण सेवेचा हेतु साध्य होणार असून श्री साईबाबांच्या शिकवणीचा प्रचार होणार आहे. श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, अधिनियम, २००४ कलम १७ (२-ण) मध्ये मानव जातीचे कल्याण करणा-या किंवा मानवाला आपत्तीमध्ये सहाय्य करणा-या अन्य कोणत्याही उदात्त कार्याला चालना देण्यात येईल, अशी तरतूद आहे. सदर तरतूदीनुसार श्री साईबाबा संस्थानमार्फत महाराष्ट्र राज्यातील आरोग्य क्षेत्रात/रुग्णसेवेच्या क्षेत्रात कार्यत नोंदणीकृत (महाराष्ट्र पब्लिक ट्रस्ट ॲक्ट १९५० किंवा सोसायटी रजिस्ट्रेशन ॲक्ट १८६० नुसार नोंदणीकृत) संस्थेस प्रत्येकी एक याप्रमाणे ५०० रुग्णवाहिकांना प्रत्येकी रुपये ०५ लाख याप्रमाणे अनुदान देण्यात यावे. अशी रक्कम सदर संस्थेला न देता मागणी करणा-या संस्थेने महिंद्रा ॲण्ड महिंद्रा कंपनीकडे आगाऊ रक्कम (रुपये ०५ लाख वजा करुन) भरावी व कागदोपत्री पूर्तता करावी. अशी रक्कम त्यांनी भरल्यानंतर संस्थानतर्फे रुपये ०५ लाख इतकी रक्कम अनुदान परस्पर कंपनीला देण्यात यावी. संबंधीत संस्थेशी करारनामा करुन घेण्यात यावा. रुग्णवाहिकेसाठी महिंद्रा ॲण्ड महिंद्रा बोलेरो इड-खत हे मॉडेल निश्चित करण्यात यावे. प्रत्येक रुग्णवाहिकेस ऋझड ड्रीशा बसवून घेण्यात यावी. रुग्णवाहिकेच्या नोंदणी व विम्याची जबाबदारी संबंधीत संस्थेची राहील. रुग्णवाहिकेवर श्री साई रुग्णवाहिका असे नमूद करण्यात यावे, अशा अटी व शर्तींवर संस्थानच्या ५०० रुग्णवाहिका खरेदी करण्याच्या ‘साई रुग्णवाहिका प्रकल्प’ उपक्रमासाठीच्या रुपये २५ कोटी निधीस शासनाने मान्यता दिली आहे.

वरील अटी व शर्तींस अधिनराहुन इच्छुक स्वयंसेवी संस्थांनी संस्थानच्या वाहन विभाग दुरध्वनी क्रमांक (०२४२३) २५८७८७ व मो. नं. ७७२००७७२५९ या क्रमांकावर संपर्क साधावा असे आवाहन ही डॉ. हावरे यांनी केले आहे.

# नववर्ष शिर्डी महोत्सव



श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीच्या वतीने नाताळ सुट्टी, चालू वर्षाला निरोप व नवीन वर्षाचे स्वागता निमित्त शिर्डी महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. श्री साईबाबांच्या दर्शनासाठी शिर्डीत होणारी संभाव्य गर्दी लक्षात घेवून समाधी मंदिर सोमवार दिनांक ३१ डिसेंबर २०१८ रोजी दर्शनासाठी रात्रभर खुले ठेवण्यात आले असल्याची माहिती संस्थानच्या मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती रुबल अग्रवाल यांनी दिली.

श्रीमती अग्रवाल म्हणाल्या, दरवर्षी नाताळ सुट्टी, चालू वर्षाला निरोप व नवीन वर्षाचे स्वागता निमित्त श्रींच्या दर्शनासाठी शिर्डीत मोठ्या प्रमाणात भाविक येत असतात. येणा–या सर्व भाविकांना श्रींच्या समाधीच्या दर्शनाचा लाभ मिळावा व होणा–या गर्दीचे नियोजन योग्य रितीने व्हावे या उद्देशाने सोमवार दिनांक ३१ डिसेंबर २०१८ रोजी श्रींचे समाधी मंदिर दर्शनासाठी रात्रभर खुले ठेवण्यात आले. त्यामुळे दिनांक ३१ डिसेंबर रोजीची शेजारती व दिनांक ०१ जानेवारी २०१९ रोजीची पहाटेची काकड आरती झाली नाही.

यानिमित्ताने दिनांक २२ डिसेंबर ते दिनांक ३१ डिसेंबर २०१८ याकालावधीत विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. यामध्ये दि.२२ डिसेंबर रोजी सायं. ७.३० ते ९.०० यावेळेत व्दारका मंडळी, बेंगलोर, दि. २३ डिसेंबर रोजी सायं. ७.०० ते ८.३० यावेळेत मनिषा धिंग्रा, दिल्ली व रात्रौ ८.३० ते ९.४५ यावेळेत रमेश ओबेरॉय, मुंबई, दि.२४ डिसेंबर रोजी सायं. ७.०० ते ९.४५ यावेळेत सुबरत, ओडीसा, दि.२५ डिसेंबर रोजी सायं. ७.०० ते ९.४५ यावेळेत विनया कुलकर्णी,नाशिक, दि.२६ डिसेंबर रोजी सायं. ७.०० ते ९.४५ यावेळेत अनिलकुमार मिस्किन, कर्नाटक, दि.२७ डिसेंबर रोजी सायं. ७.०० ते ९.४५ रोजी सुधांशु लोकेगांवकर, शिर्डी,दि.२८ डिसेंबर रोजी सायं. ७.०० ते ९.४५ यावेळत श्रृती कंकण, येवला, दि.२९ डिसेंबर रोजी सायं. ७.०० ते ९.४५ यावेळेत रविंद्र पिंगळे, शिर्डी, दि.३० डिसेंबर रोजी सायं. ७.०० ते ९.४५ यावेळेत नारायण मुंदडा व सार्थक (आप्पा) गायकवाड, मुंबई आणि दि.३१ डिसेंबर रोजी सायं. ७.०० ते ९.३० यावेळेत जगदीश मारुती पाटील, मुंबई व रात्रौ ९.३० ते ११.४५ यावेळेत साई स्वरांजली

संगीत संच, नागपूर आदी कलाकारांचे साईभजन संध्या कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

तसेच नाताळ व नवर्षाच्या सुट्टीच्या गर्दीमुळे मंगळवार दिनांक २५ डिसेंबर, सोमवार दिनांक ३१ डिसेंबर व मंगळवार दिनांक ०१ जानेवारी २०१९ रोजी असे ०३ दिवस श्री साईसत्यव्रत पूजा, अभिषेक पूजा बंद राहील याबरोबरच सोमवार दिनांक ३१ डिसेंबर व मंगळवार दिनांक ०१ जानेवारी २०१९ रोजी असे ०२ दिवस वाहन पूजा बंद ठेवण्यात आल्या.

हा महोत्सव यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी संस्थानचे अध्यक्ष डॉ.सुरेश हावरे, उपाध्यक्ष चंद्रशेखर कदम, मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती रुबल अग्रवाल व सर्व विश्वस्त यांच्या मार्गदर्शनाखाली संस्थानचे उपजिल्हाधिकारी धनंजय निकम, मनोज घोडे पाटील, उपकार्यकारी अधिकारी बाबासाहेब घोरपडे, सर्व प्रशासकीय अधिकारी, सर्व विभागांचे विभाग प्रमुख व सर्व कर्मचारी यांनी प्रयत्न केले.



## सख्या साईनाथा

सख्या साईनाथा, रक्षी मज आता ।
दारी तुझ्या येता, भव भय कैचे ।।
असोनि संसारी, नित्य घेता नाम ।
हृदयी तुझे प्रेम, नित्य आहे ।।
संकटी तारशी, नित्य निवारिशी ।
अनेक उपाधी, तूच माझा ।।
असा हितकारी, गुरु तूच माझा ।
करितसे काजा, जिवे-भावे ।।
असो तुझी दया, सदासर्वदा ।
अंतःकाळी झणी, धाव घेई ।।
तुझा भक्त नाही, कधी वाया गेला ।
तरी मी तो वाया, जाईन कैसा ।।
दृढ श्रद्धा माझी, आहे तुझ्या ठायी ।
नथुराम ध्यानी, नित्य ठेवी ।।

– नथुराम दादाजी जोशी

## तुझी शिरडी पावली

साई तुझ्या चरणी ।
मिळो मला सहारा ।
हीच आस लावली
तुझी शिरडी पावली ।।१।।
तुझी प्राप्त करण्या
कृपा माझ्या कुटुंबा ।
लाभली तुझी सावली
तुझी शिरडी पावली ।। २।।
भावपूर्ण पूजनात
चेतना प्रगटली ।
सौख्य माया लाभली
तुझी शिरडी पावली ।।३।।




–एम. के.गुम्मलवार

## पालकमंत्री प्रा.राम शिंदे व श्री.रावसाहेब दानवे, भाजपा प्रदेशाध्यक्ष यांनी श्री साईबाबांच्या समाधीचे दर्शन घेतले.



पालकमंत्री प्रा.राम शिंदे व श्री.रावसाहेब दानवे, भाजपा प्रदेशाध्यक्ष यांनी श्री साईबाबांच्या समाधीचे दर्शन घेतले. यावेळी संस्थानच्या मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती रुबल अग्रवाल,उपाध्यक्ष चंद्रशेखर कदम, विश्वस्त सर्वश्री भाऊसाहेब वाकचौरे व आदी उपस्थित होते.



पालकमंत्री प्रा.राम शिंदे व श्री.रावसाहेब दानवे, भाजपा प्रदेशाध्यक्ष यांनी श्री साईबाबांच्या समाधीचे दर्शन घेतल्यानंतर त्यांचा सत्कार करताना संस्थानच्या मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती रुबल अग्रवाल, उपाध्यक्ष चंद्रशेखर कदम, विश्वस्त सर्वश्री भाऊसाहेब वाकचौरे व आदी उपस्थित होते.

# मा.श्री.नितीन गडकरी, केंद्रीय मंत्री यांनी श्री साईबाबांच्या समाधीचे दर्शन घेतले.




मा.श्री.नितीन गडकरी, पविहन, महामार्ग जहाजबांधणी, जलसंधारण केंद्रीय मंत्री यांनी श्री साईबाबांच्या समाधीचे दर्शन घेतले. यावेळी संस्थानचे अध्यक्ष डॉ.सुरेश हावरे,उपाध्यक्ष चंद्रशेखर कदम, मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती रुबल अग्रवाल, विश्वस्त बिपीनदादा कोल्हे, आमदार सौ.स्नेहलताताई कोल्हे आदी उपस्थित होते.



मा.श्री.नितीन गडकरी, पविहन, महामार्ग जहाजबांधणी, जलसंधारण केंद्रीय मंत्री यांनी श्री साईबाबांच्या समाधीचे दर्शन घेतल्यानंतर त्यांचा सत्कार करताना संस्थानचे अध्यक्ष डॉ.सुरेश हावरे, उपाध्यक्ष चंद्रशेखर कदम, मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती रुबल अग्रवाल, विश्वस्त बिपीनदादा कोल्हे, आमदार सौ.स्नेहलताताई कोल्हे आदी.

## मा.श्री.राधा मोहन सिंग, कृषी आणि शेतकरी कल्याण, केंद्रीय मंत्री यांनी श्री साईबाबांच्या समाधीचे दर्शन घेतले.



मा.श्री.राधा मोहन सिंग, कृषी आणि शेतकरी कल्याण, केंद्रीय मंत्री यांनी श्री साईबाबांच्या समाधीचे दर्शन घेतले. यावेळी संस्थानचे विश्वस्त भाऊसाहेब वाकचौरे उपस्थित होते.



मा.श्री.राधा मोहन सिंग, कृषी आणि शेतकरी कल्याण, केंद्रीय मंत्री यांनी श्री साईबाबांच्या समाधीचे दर्शन घेतल्यानंतर त्यांचा सत्कार करताना संस्थानचे विश्वस्त भाऊसाहेब वाकचौरे.

## श्री.सुधीर मुनगंटीवार, मंत्री, वित्त आणि नियोजन, वने, महाराष्ट्र राज्य यांचे श्री साईबाबांच्या समाधीचे दर्शन




जानेवारी-फेब्रुवारी २०१९

# साईलीला

RNI Regd. No. : MAH/MAR/2001/10353

## शिर्डी : सरत्या वर्षाला निरोप, नववर्षाचे स्वागत...




प्रकाशक व मुद्रक मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी श्री साईसंस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी करिता हे द्वैमासिक टॅको व्हिजन प्रा. लि. १०५, अे.बी.सी. गर्व्हमेंट ई इस्टेट, चारकोप, कांदीवली (प), मुंबई - ४०००६७ येथे छापून साईनिकेतन, ८०४-बी, डॉ. आंबेडकर मार्ग, दादर, मुंबई - ४०००१४ येथे प्रकाशित केले.
* संपादक : मुख्य कार्यकारी अधिकारी, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी
* कार्यकारी संपादक : विद्याधर ताठे 9881909775